# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा
## परवानगीचे आदेश
## महाराष्ट्र शासन

क्रमांकः नमाशा १००२/(२४८/२००२) माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांकः ५ ,एप्रिल, २००२

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/नाशिक/अमरावती/कोल्हापूर/औरंगाबाद/पुणे

**विषयः-२०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.**

नवीन माध्यमिक शाळेला परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून सोबत जोडलेल्या सहपत्रातील ११ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) शासनाच्या पूर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(ड) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

(इ) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक
श्री संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय

(ई) " कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा " असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

(भि.य.मंता)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:
शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर/ठाणे/अकोला/ठाणे/कोल्हापूर/जळगाव/ औरंगाबाद/पुणे
मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती, माशि-१.

मुख्याध्यापक
श्री.संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय
गजेवाडी-ढिवड, ता मावळ, जि.पुणे

Scanned with OKEN Scanner

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मराठी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेल्या संस्थांची यादी

| | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| | आदर्श शिक्षण व आरोग्य सेवा संस्था, कलांद्री(बोरगाव), ता.उमरेड, जि.नागपूर | आलेसूर, ता.उमरेड, जि.नागपूर | मराठी | आठव |
| | शिक्षण विकास मंडळ, टिटवाळा, जि.ठाणे | अनखरपाडा, ता.कल्याण, जि.ठाणे | मराठी | आठव |
| | पयोष्णी शिक्षण संस्था, कुंभशी, ता.मूर्तिजापूर, जि.अकोला | रामटेक, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला | मराठी | आठव |
| | विद्या प्रतिष्ठान, महाराष्ट्र, पुणे | पाणजू, ता.वसई, जि.ठाणे | मराठी | आठव |
| | श्री.गणेश शिक्षण संस्था, सातार्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | सातार्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | मराठी | आठव |
| | बी.यु.एन.रायसोनी एज्युकेशन ट्रस्ट, जळगाव | औद्योगिक वसाहत, रायसोनीनगर, जळगाव | मराठी | आठव |
| | समर्थ एज्युकेशन सोसायटी, उल्हासनगर | उल्हासनगर, जि.ठाणे | मराठी | आठव |
| | तक्षशिला शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद | गांधेली, जि.औरंगाबाद | मराठी | आठव |
| | तक्षशिला शिक्षण संस्था,. औरंगाबाद | ब्राम्हणगाव, ता.पैठण, जि.औरंगाबाद | मराठी | आठव |
| | ज्ञानराज शिक्षण प्रसारक मंडळ, तळेगावदाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | राजेवाडी दिवाड, ता.मावळ, जि.पुणे | मराठी | आठव |
| | ज्ञानराज शिक्षण प्रसारक मंडळ, कापुर्णी पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे | वारु, ता.मावळ, जि.पुणे | मराठी | आठव |

एकूण ११ (अकरा)माध्यमिक शाळा